# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:23.06.2026** **वार:मंगळवार**

---

1. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज राष्ट्रपती भवनात दुसऱ्या टप्प्यातील पद्म सन्मान प्रदान करणार
2. राष्ट्रप्रथम या भावनेतून भारताच्या विकासासाठी सरकार कार्यरत असल्याचं पंतप्रधानांच प्रतिपादन
3. उत्तर प्रदेशातल्या लखनौमधल्या कोचिंग क्लासमध्ये लागलेल्या आगीच्या दुर्घटनेत आतापर्यन्त 15 विद्यार्थ्यांचा होरपळून मृत्यू तर 9 जण जखमी
4. देशात आता पर्यंत 5 लाख नागरिकांनी केला अवयव दानाचा संकल्प आणि
5. अमेरिकन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेला आजपासून प्रारंभ; लक्ष्य सेन आणि तन्वी शर्मा करणार भारतीय संघाचं नेतृत्व

**पद्म पुरस्कार**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज संध्याकाळी नवी दिल्लीतील राष्ट्रपती भवनात दुसऱ्या टप्प्यातील 2026 चे पद्म सन्मान प्रदान करणार आहेत. यामध्ये दोन पद्म विभूषण, सात पद्म भूषण आणि 56 पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे. टेनिसपटू विजय अमृतराज, अभिनेते मम्मूट्टी, पार्श्वगायिका अलका याज्ञिक आणि क्रिकेटपटू रोहित शर्मा यांसारख्या 65 मान्यवरांचा राष्ट्रपतींच्या हस्ते यावेळी पद्म पुरस्कारांनी सन्मान केला जाईल. प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला सरकारने 2026 साठी 131 पद्म पुरस्कारांची घोषणा केली होती.
यापूर्वी 25 मे रोजी राष्ट्रपती भवनात पहिल्या टप्प्यातील सोहळा पार पडला होता, यामध्ये 66 पुरस्कार विजेत्यांचा सन्मान करण्यात आला होता.

**पंतप्रधान**

गेल्या 10 वर्षात राष्ट्रप्रथम या भावनेतून भारताच्या विकासासाठी विविध पावल उचलण्यात आली असून, जगात आज भारत सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आणि विश्वासार्ह शक्ती म्हणून उदयाला येत आहे अस प्रतिपादन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केल. नवी दिल्लीत काल एका खाजगी माध्यम संस्थेच्या वतीने आयोजित संमेलनात ते बोलत होते. पंतप्रधान पुढ म्हणले की सरकारच्या वतीने वर्तमानस्थितीत देशाच्या विकासासाठी करण्यात येत असलेले प्रयत्न आणि निर्णय देशाच्या पुढील 1 हजार वर्षासाठीच्या भविष्याला आकार देणारे आहेत. गेल्या 12 वर्षाच्या केंद्रसरका रच्या कार्यकाळात 45 हजार गावांपर्यंत मोबाइल संपर्क यंत्रणा पोहचली असून 6 हजार नवीन टपाल कार्यालये सुरू करण्यात आली आहेत तर 75 हजार बँक कर्मचारी कार्यरत आहेत अशी माहितीही पंतप्रधानांनी दिली.

**अमित शहा दिल्ली**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज नवी दिल्ली मध्ये नाफेड च्या लिलाव पोर्टलचे उद्घाटन करणार आहेत. लिलाव प्रक्रीयेमध्ये पारदर्शकता, कार्यक्षमता आणि कामकाजात सुलभता आणण्याच्या दिशेनं उचललेलं हे एक महत्वाचं पाउल आहे.

**मोराक्को**

भारत आणि मोराक्को दरम्यान दहशदवादविरोधी संयुक्त कार्यसमुहाची काल नवी दिल्लीत बैठक झाली. भारताच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे संयुक्त सचिव डॉ विनोद बाहडे आणि मोराक्कोच्या राष्ट्रीय न्यायिक पोलिस ब्रिगेड चे प्रमुख हीशाम बाली यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. यावेळी दोन्ही देशांनी विविध प्रकारातील दहशदवाद, विशेषतः सीमावर्ती भागात सुरू सणाऱ्या अतिरेकी कारवाया यांची कडक निंदा केली. भारत आणि मोरोक्को दरम्यान माहिती आणि कार्यप्रणाली वषयी परस्पर सहकार्य आणि देवाणघेवाण करण्याविषयी या बैठकीत सहमती झाली .

**अजित डोभाल**

नवी दिल्लीत सुरू असलेल्या 16 व्या ब्रिक्स देशांच्या सुरक्षा सल्लागारांच्या बैठकी दरम्यान, काल चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांच्याबरोबर भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांनी द्विपक्षीय चर्चा केली. यावेळी भारत आणि चीन दरम्यानचे संबंध सामान्य बनवण्यासाठी करण्यात येत असलेल्या आणि परस्पर सहकार्य वाढवण्यासाठीच्या प्रयत्नांचा आढावा घेण्यात आला.

**आग**

उत्तर प्रदेशातल्या लखनौमधल्या अलीगंज इथल्या एका कोचिंग क्लास मध्ये काल लागलेल्या आगीच्या दुर्घटनेत आतापर्यन्त 15 विद्यार्थ्यांचा होरपळून मृत्यू झाला असून 9 जण जखमी झाले आहेत. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी 6 जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यापैकी 4 जणांना पोलिसांनी आतापर्यन्त अटक केली आहे. उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या प्रकरणी लखनौ विकास प्राधिकरण, अग्निशमन विभाग आणि वीज वितरण विभागातील 4 अधिकाऱ्यांना निलंबित केल आहे. तसच या दुर्घटनेच्या तपासासाठी योगी आदित्यनाथ यांनी विशेष तपास पथकाची नेमणूक केली असून त्यानं 7 दिवसांत याबाबतचा अहवाल द्यायचे निर्देश दिले आहेत. आगीच्या भक्ष्यस्थानी पडलेली इमारत पोलिसांनी सील केली असून अधिक तपास करण्यासाठी या भागात प्रवेश बंदी करण्यात आली आहे. दरम्यान, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी काल घटनास्थळी जाऊन पाहणी केली. राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केल आहे. 'पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधी'तून मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी दोन लाख रुपयांची, तसेच जखमींना 50 हजार रुपयांची मदत देण्याची घोषणा पंतप्रधानांनी समाजमध्यमांवरील संदेशांत केली आहे.

**<u>कतार दुर्घटना</u>**

कतार मधील रास लाफांन इथ सर्वात मोठ्या गॅस निर्मिती कारखान्यात परवा रात्री झालेल्या स्फोटात 13 जणांचा मृत्यू झाला असून त्यात 12 भारतीयांचा समावेश आहे. या दुर्घटनेत 66 जण जखमी झाले आहेत. दोहा इथल्या भारतीय दुतावासाने 12 भारतीयांच्या मृत्यूची बातमी खरी असल्याच स्पष्ट केल असून, त्याबद्दल शोक व्यक्त केला आहे. भारताचे परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनीही या दुर्घटनेबद्दल तीव्र शोक व्यक्त केला आहे. दोहा इथल्या भारतीय दूतावासतील अधिकाऱ्यांच्या आपण सतत संपर्कात असून ते दुर्घटनाग्रस्त भारतीयांच्या कुटुंबियांना सर्वतोपरी मदत करत असल्याच एस जयशंकर यांनी आपल्या समाज माध्यमावरील संदेशात म्हंटल आहे .

**<u>अवयव दान</u>**

देशात 5 लाख नागरिकांनी अवयव दानाचा संकल्प केला असून हा आतापर्यंतचा देशातील सर्वोच्च विक्रम आहे. अवयव दान आणि त्वचा दानाबद्दल नागरिकांमध्ये वाढत असलेल्या जागरुकतेच आणि सामूहिक जबाबदारी घेण्याप्रती वचन बद्धतेच हे प्रतीक असल्याच केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने म्हंटल आहे. अवयव आणि त्वचा दाना मुळे अवयव प्रत्यारोपण शस्त्र क्रियेसाठी प्रतीक्षेत असणाऱ्या हजारो रुग्णांना यामुळे नवजीवन मिळण्याची आशा निर्माण होते आहे. सरकारने सामाजिक जबाबदारी विकसित करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांच हे यश असल्याच ही मंत्रालयाने म्हंटल आहे. राष्ट्रीय अवयव आणि त्वचा प्रत्यारोपण समितीचे संचालक डॉ अनिल कुमार यांनी एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिल्याबद्दल नागरिकांचे आभार मानले आहेत तसच देशातील सर्व राज्य सरकारांनाही धन्यवाद दिले आहेत .

**<u>राजीनामा</u>**

ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांनी काल आपल्या पदाचा राजीनामा दिला. मजूर पक्षाचं प्रमुखपदही त्यांनी सोडलं आहे. ब्रिटीश पार्लमेंटचं अधिवेशन येत्या सप्टेंबरमधे सुरु होणार असून त्या आधी नवीन नेत्याची निवड होईपर्यंत आपण पदाचा कार्यभार सांभाळणार असल्याचं स्टार्मर यांनी जाहीर केलं. अलिकडेच पोटनिवडणूक जिंकणारे अँडी बर्नहॅम हे स्टार्मर यांची जागा घेतील असे संकेत आहेत.

**<u>फिफा विश्वचषक</u>**

फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत अमेरिकेतील फिलाडेल्फिया इथं आय गटात झालेल्या फ्रान्स आणि इराक दरम्यांनच्या सामन्यात फ्रांस संघाने विजय मिळवला तर काल रात्री अर्लिंग्टन इथं जे गटात झालेल्या सामन्यात अर्जेन्टिनानं ऑस्ट्रियाचा 2-0 असा पराभव केला. अर्जेंटिनाचा कर्णधार लिओनेल मेस्सीनं जर्मनीच्या मिरोस्लाव क्लोसचा 16 गोलांचा विक्रम मागे टाकत विश्वचषकाच्या इतिहासात सर्वाधिक गोल करणारा खेळाडू होण्याचा मान मिळवला आहे.

**<u>डमिंटन</u>**

अमेरिकन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेला आजपासून कॅलिफोर्नियामध्ये प्रारंभ होत आहे. या स्पर्धेत लक्ष्य सेन आणि तन्वी शर्मा भारतीय संघाचं नेतृत्व करणार आहेत. पुरुषांच्या एकेरी गटात लक्ष्य सेनची लढत बेल्जियमच्या जूलियन कैरागीशी होईल. तर किदांबी श्रीकांतचा सामना चीनी ताइपेईच्या लियाओ झूओ-फू याच्याशी होईल. महिलांच्या एकेरी गटात तन्वी शर्मा आणि जर्मनीच्या यवोन ली यांच्यात लढत होणार आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल,

# नमस्कार.